**सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प सादर करणे**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**श्री. अजित पवार** (उपमुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

महाराष्ट्र शासनाचा २०११-१२ या वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना
**श्री. अजित पवार,** उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी
बुधवार दिनांक २३ मार्च २०११ रोजी केलेले भाषण

**भाग पहिला**

अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन २०११-१२ या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

**२.** राज्यात कृषी व उद्योग क्षेत्राची उन्नती व्हावी व त्या माध्यमातून तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच राज्याच्या सर्व भागांचा व समाजातील सर्व घटकांचा, विशेषत: दुर्बल घटकांच्या विकासात वाटा असावा हा दृष्टीकोन अर्थसंकल्प तयार करताना समोर ठेवला आहे.

**३. स्थूल आर्थिक आढावा व राज्याचे उत्पन्न.--** पूर्वानुमानानुसार २००४-०५ या स्थिर किमतीवर आधारित राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न २०१०-११ मध्ये १०.५ टक्क्यांनी वाढणे अपेक्षित आहे. आधीच्या वर्षी राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नात ८.७ टक्के वाढ झाली होती. महाराष्ट्राचे अंदाजित दरडोई राज्य उत्पन्न सन २००९-१० मध्ये ७४ हजार २७ रुपये इतके आहे, तर अंदाजित दरडोई राष्ट्रीय उत्पन्न ४६ हजार ४९२ रुपये इतके आहे. अखिल भारतीय घाऊक किमतीच्या निर्देशांकावर आधारित चलनवाढीचा दर जानेवारी २०११ करिता ८.२ टक्के इतका होता, तर जानेवारी २०१० करिता तो ८.५ टक्के होता. पायाभूत वर्ष १९९३-९४ वर आधारित अखिल भारतीय औद्योगिक उत्पादनाच्या सरासरी निर्देशांकात एप्रिल ते डिसेंबर २०१० या कालावधीकरिता मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ८.६ टक्के एवढी वाढ झाली.

**४. कृषी दृष्टीकोन.--** राज्याच्या प्रगतीत कृषी क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे व ग्रामीण भागातील जनतेचे राहणीमान सुधारावे यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. यादृष्टीने शासन शेतीसाठी लागणाऱ्या सर्व बाबींचा पुरवठा सुरळीत रहावा तसेच शेतीच्या उत्पादकतेत वाढ व्हावी यासाठी विविध कार्यक्रम राबवित आहे. मी या संदर्भातील माझे अर्थसंकल्पीय प्रस्ताव थोडक्यात आपल्यासमोर ठेवतो.

**५. अल्प व्याजदराने पीक कर्ज.--** शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने, अल्पमुदत शेतीकर्ज उपलब्ध करण्याच्या योजनेनुसार मुदतीत पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजारपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजदराने व त्या पुढील रुपये ३ लाखपर्यंतचे कर्ज रुपये २ टक्के व्याजदराने उपलब्ध होणार आहे. या योजनेअंतर्गत द्यावयाच्या व्याज अनुदानासाठी सन २०११-१२ करिता रुपये ८४ कोटी २८ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध व्हावे यासाठी

[ श्री. अजित पवार ]

राज्य शासन गेल्या तीन वर्षांपासून खतांचा राखीव साठा ठेवत आहे. ही योजना पुढील खरीप हंगामासाठीही सुरू ठेवण्यात येणार आहे. त्यासाठी रुपये ५१ कोटी ५० लक्ष तरतूद ठेवण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक ती थकहमीही उपलब्ध केली जाईल.

**६. शेतकऱ्यांच्या कृषिपंपाना वीज अनुदान.--** राज्यात जवळजवळ ३१ लक्ष कृषीपंप आहेत. राज्यातील शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी कृषीपंपांना पुरविण्यात येणाऱ्या विजेकरिता अनुदान देण्यात येते. सन २०११-१२ या वर्षाकरिता रुपये २ हजार ५०० कोटी अनुदान प्रस्तावित आहे.

**७. कृषीपंपाचे विद्युतीकरण.--** सन २०१०-११ मध्ये महावितरण कंपनी २ लक्ष ७५ हजार कृषीपंपांना वीज जोडणी उपलब्ध करून देणार आहे. एप्रिल २०११ पासून 'मागेल त्याला वीज जोडणी' या दिशेने वाटचाल करण्याचा आमचा प्रयत्न आहे. कृषीपंप विद्युतीकरण कार्यक्रमास वेग यावा यासाठी कृषीपंपांच्या विद्युतीकरण अनुशेष भरून काढण्याकरिता रुपये ८० कोटींची तरतूद २०११-१२ या वर्षाकरिता प्रस्तावित आहे.

**८. कृषी संजीवनी योजना-२०११.--** विजेच्या दरात मोठी सवलत दिली तरी अनेक शेतकऱ्यांकडे विजेची देयके थकलेली आहेत. शेतकरी बांधवांकडे डिसेंबर २०१० अखेर वीज बिलापोटी सुमारे रुपये ५ हजार ९०० कोटी थकबाकी असून यापैकी रुपये २ हजार ९१० कोटी मुद्दल, रुपये २ हजार ९३० कोटी व्याज आणि रुपये ५९ कोटी विलंब आकार आहे. या प्रश्नातून मार्ग काढता यावा म्हणून मी शेतकऱ्यांसाठी 'कृषी संजीवनी योजना' जाहीर करतो आहे. या योजनेनुसार मुद्दलाची विशिष्ट तारखेपर्यंतची थकबाकी पूर्णपणे भरणा करणाऱ्या कृषीपंपधारकांचे व्याज व विलंब आकार माफ करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेचा फायदा २२ लक्ष शेतकऱ्यांना होईल. या योजनेचे अन्य तपशील सविस्तरपणे नंतर दिले जातील.

**९. राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना.--** राज्यात केंद्र शासनाच्या मदतीने राष्ट्रीय कृषी विमा योजना, सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना व हवामान आधारित पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. या तीनही योजनांमध्ये विमा हप्ता अनुदान उपलब्ध करून दिले जाते. त्यासाठी अंदाजपत्रकात रुपये ८३ कोटी तरतूद करण्यात आली आहे. पिक विमा योजनेत सुमारे २६ लक्ष शेतकऱ्यांचा सहमभाग आहे. निसर्गावर आधारित शषती करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यामुळे विशेष दिलासा मिळणार आहे.

**१०. राष्ट्रीय कृषी विकास योजना.--** सन २०१०-११ मध्ये कोरडवाहू क्षेत्रात कडधान्य व तेलबिया विकासासाठी विशेष मोहिम, सूक्ष्म सिंचन, कोकण विभागात बियाणे बदल कार्यक्रम, मालगुजारी तलावांची दुरुस्ती, तालुका बिजगुणन केंद्रांचे बळकटीकरण, कांदा साठवण इत्यादी प्रकल्पांकरिता राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्ग रुपये ३०० कोटीपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे. सन २०११-१२ करिता त्यासाठी रुपये ४१५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

[ श्री. अजित पवार ]

**११. केंद्र योजनांसाठी तरतूद.--** कृषी विभागांतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या कृती आराखडा, तेलबिया योजना, कापूस विकास तंत्रज्ञान अभियान, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान इत्यादी केंद्र पुरस्कृत योजनांसाठी रुपये २०९ कोटी ७० लक्ष तरतूद केंद्र हिश्श्यासाठी अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यास अनुरूप राज्य हिश्श्याची तरतूद उपलब्ध केली जाईल.

**१२. कृषी पणन विकास प्रकल्प.--** राज्यातील पणन व्यवस्थेतील पायाभूत सुविधांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करण्याकरिता राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये जागतिक बँक सहाय्यित 'महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प' राबविण्यात येत आहे. सन २०११-१२ करिता या प्रकल्पास रुपये ४५ कोटी निधी अर्थसंकल्पित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच 'कृषी-व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास प्रकल्प' सन २०११-१२ पासून कार्यान्वित करण्यात येत आहे. यासाठी सन २०११-१२ करिता रुपये १५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**१३. काढणी पश्चात व्यवस्थापन.--** राज्य शासनाने वाशी, नवी मुंबई येथे रुपये १८ कोटी किमतीच्या आंबा वि-किरण प्रकल्पास तसेच रुपये ३ कोटी ५० लक्ष किमतीच्या लघु काजू प्रक्रिया व साठवणूक प्रकल्पास मान्यता दिली आहे. कळवण, जिल्हा नाशिक येथे डाळींब, द्राक्ष व कांदा पिकांकरिता , राहाता, जिल्हा अहमदनगर येथे फळे व भाजीपाल्याकरिता आणि यावल, जिल्हा जळगाव येथे केळी पिकाकरिता निर्यात सुविधा केंद्रांच्या उभारणीस तसेच त्याभोवती प्रत्येकी ५ फार्म पॅक हाऊसेस उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासाठी सन २०११-१२ मध्ये आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**१४. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना.--** राज्य निधीतून रोजगार हमी योजनेकरिता सन २०१०-११ या वर्षात जानेवारी २०११ अखेर रुपये ३६२ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २०११-१२ करिता रुपये ७४५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. यापैकी वैयक्तिक लाभाच्या योजनांपैकी जवाहर विहीर योजनेकरिता रुपये २२१ कोटी, फलोत्पादन योजनेकरिता रुपये १३४ कोटी व शेततळी योजनेसाठी रुपये २४ कोटी ३२ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१५. नाबार्ड अर्थसहाय्यातून मेगा पाणलोट विकास कार्यक्रम.--** सन २००९-१० पासून ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत नाबार्ड अर्थसहाय्यातून मेगा पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत एकूण ४३ प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल नाबार्डकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून त्यापैकी रुपये ६९ कोटी ४७ लक्ष किमतीच्या १६ प्रकल्पांना नाबार्डने मान्यता दिली आहे. सन २०११-१२ वर्षाकरिता या कार्यक्रमासाठी रुपये ६२ कोटी १८ लक्ष नियतव्यय प्रस्तावित आहे.

**१६. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम.--** केंद्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम योजनेंतर्गत ९ लक्ष ९५ हजार हेक्टर क्षेत्राच्या २४३ पाणलोटांना केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांची एकूण किंमत रुपये १ हजार २५५ कोटी आहे. यासाठी सन २०११-१२ या वर्षाकरिता आवश्यक ती तरतूद उपलब्ध केली जाईल.

[ श्री. अजित पवार ]

**१७. कंत्राटी पद्धतीने कुक्कुट पालन.--** शेतकऱ्यांना जोडधंदा व त्यातून आर्थिक उत्पन्न प्राप्तीसाठी कंत्राटी पद्धतीने कुक्कुट पालन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेअंतर्गत या क्षेत्रातील खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने लाभार्थींना एक दिवसाची कुक्कुट पिल्ले संगोपनासाठी उपलब्ध करून देण्यात येतील. कुक्कुट पिलांच्या संगोपनानंतर उद्योजक लाभार्थींकडून पक्ष्यांची खरेदी करतील. लाभार्थींना द्यावयाच्या विविध सवलतींसाठी रुपये २० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**१८. पशुवैद्यकीय संस्थांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण.--** राज्यातील पशुधनास वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध स्तरावरील दवाखान्यांचे बांधकाम, आधुनिकीकरण व बळकटीकरणाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. यासाठी २०११-१२ या वर्षाकरिता जिल्हा व राज्य योजनांतर्गत रुपये ५७ कोटी २७ लक्ष प्रस्तावित आहेत.

**१९. राष्ट्रीय सहकार विकास कार्यक्रमांतर्गत मच्छीमार नौकांचे यांत्रिकीकरण.--** राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेअंतर्गत मच्छीमारांना नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी कर्जाद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. सन २०१०-११ मध्ये १९५ नौकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. सन २०११-१२ करिता या कार्यक्रमासाठी रुपये ४२ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**२०. पाटबंधारे विकास क्षेत्रातील प्रगती.--** सन २०११-१२ या वर्षाकरिता जलसंपदा विभागाला उपलब्ध केलेल्या रुपये ७ हजार ३९३ कोटीपैकी रुपये ६ हजार ३०० कोटी इतकी तरतूद पाटबंधारे प्रकल्पांसाठी करण्यात आली आहे. अंतिम टप्प्यातील प्रकल्प पूर्ण करणे, सिंचनक्षम प्रकल्प तसेच पाणीसाठा निर्मितीच्या प्रकल्पांवर भर देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. त्यानुसार सन २०१०-११ मध्ये ३०० पेक्षा जास्त प्रकल्प पूर्ण करून १ लक्ष ७५ हजार हेक्टर सिंचनक्षमता निर्माण करण्यात आली. सन २०११-१२ मध्ये सुमारे १५० प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सन २०११-१२ मध्ये २ लक्ष हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमता व ६० अब्ज घनफूट पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**२१. वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम.--** केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत राज्याला आतापर्यंत रुपये ८ हजार ३९ कोटी इतके केंद्रीय सहाय्य प्राप्त झाले आहे. सन २००८-०९ व २००९-१० या आर्थिक वर्षात देशात सर्वाधिक निधी महाराष्ट्राला प्राप्त झाला. सन २०१०-११ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून आतापर्यंत रुपये १ हजार २५७ कोटी सहाय्य प्राप्त झाले आहे. सन २०११-१२ मध्ये वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत एकूण नियतव्ययापैकी रुपये २ हजार ७७२ कोटींचा नियतव्यय उबलब्ध करून देण्यात येत आहे.

**२२. जलविद्युत प्रकल्प.--** राज्यातील विजेची वाढती गरज विचारात घेऊन राज्य शासनाने २५ मेगावॅटपेक्षा कमी स्थापित क्षमतेचे जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून पूर्ण करण्याचे धोरण स्वीकारले आहे. तथापि, राज्याच्या जलविद्युत प्रकल्पांकरिता सन २०११-१२ साठी रुपये ३८० कोटींचा नियतव्यय प्रस्तावित आहे.

[ श्री. अजित पवार ]

**२३. सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य संस्थांची बांधकामे.--** आता मी आरोग्य, शिक्षण व इतर मूलभूत गरजांबद्दल माझे प्रस्ताव आपल्यासमोर ठेवीत आहे.

**२३.१.** सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्थापन केलेल्या शहरी आणि ग्रामीण भागातील विविध आरोग्य संस्थांच्या बांधकामांसाठी एकूण रुपये २४१ कोटी ९५ लक्षचा निधी सन २०११-१२ मध्ये देण्यात येत आहे.

**२४. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान.--** केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असून २०११-१२ यावर्षी राज्याच्या वाट्याची रुपये १६६ कोटी इतकी रक्कम राज्य शासन देत आहे.

**२५. जिल्ह्यातील रुग्णालयातील डॉक्टर व रुग्णांच्या सुविधांमध्ये वाढ करणे.--** ग्रामीण भागातील रुग्णांना एक्स-रे, इसीजी इत्यादी सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर व रक्तपेढीची सुविधा ग्रामीण रुग्णालयांच्या स्तरावर उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. विविध रुग्णालयांत प्रयोगशाळा, तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी विविध सुविधांमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी २४ कोटी रुपये इतका निधी देण्यात येत आहे.

**२६. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांचे बांधकाम.--** वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांना प्रगतिपथावर असलेल्या तसेच नवीन बांधकामांसाठी नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अंतर्गत ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणेसाठी रुपये २० कोटी ५० लक्ष, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडसाठी रुपये ८ कोटी ३३ लक्ष, कर्क रोग रुग्णालय, औरंगाबादसाठी रुपये ५ कोटी ४३ लक्ष आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबादसाठी (घाटी) रुपये २५ कोटी, कस्तुरबा हेल्थ सोसायटी, वर्धा कॅन्सर सेंटर करिता रुपये ६ कोटी तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील नवीन ग्रंथालय इमारत बांधकामासाठी रुपये २ कोटी तरतूद प्रस्तावित आहे. यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठीही आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**२७. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९.--** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी केंद्र शासनाने "बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' लागू केला आहे. या कायद्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. शिक्षण व्यवस्थेत सर्वंकष सुधार व्हावा यासाठी आवश्यक तपशीलवार सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाकडे रुपये २ हजार ५०० कोटींचा कार्यक्रम सादर करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आवश्यक राज्याचा हिस्सा म्हणून रुपये ७८० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करीत आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गतही विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. या योनेसाठी सन २०११-१२ करिता रुपये ५०० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**२८. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती.--** अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या विकासासाठी

[ श्री. अजित पवार ]

सन २००८-०९ या वर्षापासून मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीच्या एकूण संख्येपैकी ३० टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. सन २०११-१२ या वर्षाकरिता या योजनेसाठी रुपये ४८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**२९. तंत्रशिक्षण बांधकामे.--** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्र माध्यमिक शाळा आणि तंत्र निकेतन यांच्या बांधकामांसाठी २०११-१२ या वर्षात रुपये ९० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**३०. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम.--** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २०११-१२ या वर्षात ८ हजार ३०० गावे/वाड्यांमध्ये पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. २०११-१२ करिता जिल्हा योजना व राज्य योजनांतर्गत अनुक्रमे रुपये ४९१ कोटी ४२ लक्ष व रुपये २०८ कोटी ४३ लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**३१. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान.--** महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत रुपये ४०० कोटी किमतीच्या पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. या अभियानासाठी सन २०११-१२ या वर्षाकरिता रुपये २१३ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे. नागरी पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनेसाठी रुपये १०० कोटी एवढा जादा नियतव्यय २०११-१२ साठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या विशेष निधीतून कोल्हापूर, जालना व अमरावती शहरांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**३२. पर्यावरण संतुलन ग्राम विकास अभियान.--** पर्यावरण संतुलन हा केंद्रबिंदू ठेऊन गावाचा शाश्वत विकास साधण्यासाठी **'पर्यावरण संतुलित ग्रामविकास अभियान'** हा कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. या योजनेत गावाच्या कामगिरीचा विचार करून, थेट ग्रामपंचायतींना निधी दिला जाणार आहे. ग्रामस्थांनी या निधीचा विनियोग त्यांच्या नियोजनानुसार पर्यावरणपूरक आणि शाश्वत स्वरूपाच्या भौतिक मूलभूत सुविधांसाठी वापरावयाचा आहे. या लोकाभिमुख व महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी २०११-१२ या वर्षाकरिता रुपये २०० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**३३. पर्यावरण विषयक जनजागृती व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी जनजागृती कार्यक्रम.--** पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेता या विभागासाठी सन २०११-१२ या वर्षाकरिता रुपये १६ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. ऊर्जेची बचत तसेच ग्लोबल वॉर्मिंगसह पर्यावरण जागृती करण्याच्या उद्देशाने जनतेमध्ये जनजागृती कार्यक्रम तर राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना राबविण्यात येणार आहे.

**३४. राज्याचे युवा व क्रीडा धोरण.--** राज्याचे युवा धोरण व क्रीडा धोरण ठरविण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या धोरणाचे प्रारूप वेबसाईटवर प्रसिद्ध करून नागरीकांकडून सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्या सूचनांचा विचार करून धोरणाला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. प्रस्तावित योजनांसाठी रुपये २५ कोटी इतकी प्राथमिक तरतूद करण्यात आली आहे.

[ श्री. अजित पवार ]

**३५. कुस्ती, कबड्डी, व्हॉलीबॉल व खो-खो या स्पर्धांच्या अनुदान मर्यादेत वाढ करणे.--** राज्य शासनाच्या वतीने आयोजित कुस्ती, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो स्पर्धांचे अनुदान प्रत्येकी रुपये ५० लक्षपर्यंत वाढविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

**३६. नागपूर विभागीय क्रीडा संकुल.--** प्रत्येक विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी रुपये २४ कोटी इतके अनुदान देऊन विभागीय क्रीडा संकुल उभारणीची योजना सध्या प्रचलित आहे. नागपूर ही उपराजधानी असल्याने नागपूर विभागीय क्रीडा संकुलासाठी एकूण रुपये ४० कोटी अनुदान विशेष बाब म्हणून देण्यात येणार आहे.

**३७. कुस्तीगिरांच्या मासिक मानधनात वाढ.--** हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी आदी मानाचे किताब प्राप्त केलेल्या कुस्तीगिरांना देण्यात येणाऱ्या मासिक मानधनात वाढ करण्यात येणार आहे.

**३७.१.** माजी खासदार, हिंद केसरी, 'जकार्ता वीर' मारुती माने यांचे कुस्तीमधील अमूल्य योगदान विचारात घेऊन त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कवठेपिराण, तालुका मिरज, जिल्हा सांगली या मूळ गावी त्यांचे स्मारक उभारण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

**३८. पूरक पोषण आहार योजना.--** एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत आदिवासी ग्रामीण व नागरी प्रकल्पांतील अंगणवाड्यांतील ६७ लक्ष ८८ हजार बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना देण्यात येणाऱ्या सध्याच्या पूरक पोषण आहाराच्या दरामध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी १ रुपयाने वाढ केली जाणार आहे. त्यासाठी रुपये २११ कोटी अतिरिक्त तरतूद केली जाईल. अंगणवाडी बांधकामासाठी यावेळी भरीव रक्कम ठेवली असून, शहरी भागात अंगणवाड्यांसाठी भाड्याने जागा घेता याव्यात, यासाठीही तरतूद करण्यात येत आहे.

**३९. महिलांसाठी समुपदेशन केंद्र.--** महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करून त्यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने महिला आयोगाच्या सहमतीने जिल्हा परिषदेमार्फत समुपदेशन/मदत केंद्रे सुरू करण्यात येतील. अशी केंद्रे जिल्हा स्तरावर सुरू व्हावीत, यादृष्टीने आवश्यक नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येईल.

**४०. बाल कामगार.--** बाल कामगार प्रतिबंधक अधिनियमानुसार मुक्त केलेल्या बाल कामगारांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पांतर्गत १५ जिल्ह्यांत ३३६ शाळा चालविल्या जात आहेत. २०११-१२ या वर्षाकरिता बाल कामगार निर्मूलनासाठी रुपये १६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**४१. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी घरकुल योजना.--** शासनाने अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गाकरिता कच्च्या घरांचे पक्क्या घरात रूपांतर करण्याच्या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात सर्व दारिद्र्य रेखेखालील लाभार्थींना प्राधान्य देऊन योजनेची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यासाठी २०११-१२ या वर्षाकरिता रुपये ८०० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

[ श्री. अजित पवार ]

**४२. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना.--** विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजघटकास मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे, त्यांचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांना स्थिरता प्राप्त होण्यासाठी '*यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना*' राबविण्याचा शासनाचा मानस आहे. यामध्ये इतर कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ प्राप्त न झालेल्या ग्रामीण क्षेत्रातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना जमीन उपलब्ध करून घरे बांधून देण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी सन २०११-१२ या वर्षाकरिता रुपये २० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**४३. शासकीय वसतिगृह इमारतींचे बांधकाम.--** सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय मुला-मुलींसाठी २७१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी १८१ वसतीगृहे भाड्याच्या इमारतींमध्ये आहेत. त्यातील ५२ वसतिगृहांसाठी शासकीय इमारती बांधण्याचे काम सुरू असून त्याव्यतिरिक्त आणखी २५ वसतिगृहांसाठी इमारती बांधण्याचे काम सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये सुरू करण्यात येईल. यासाठी सन २०११-१२ या वर्षाकरिता रुपये १३५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**४४. विशेष साहाय्य योजना.--** संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, यासाठी सन २०११-१२ वर्षाकरिता रुपये ३८० कोटी तरतूद प्रस्तावित आहे. लाभार्थींना सहजतेने अनुदान प्राप्त व्हावे, यासाठी स्मार्ट कार्डाचा वापर करून बायोमेट्रिक पद्धतीने अनुदान वाटप करण्याचा कार्यक्रम ठाणे, कोल्हापूर आणि बीड जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर हाती घेण्यात आला आहे.

**४५. सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना.--** आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांची शाळेत नियमित उपस्थिती राहावी, तसेच त्यांची गळती नियंत्रित ठेवता यावी या उद्देशाने राज्यातील इयत्ता १ ली ते १० वी इयत्तांत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तसेच इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी 'सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना' सन २०१०-११ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेकरिता सन २०११-१२ साठी रुपये २२४ कोटी ९७ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

**४६. शासकीय आश्रमशाळा बांधकाम.--** आश्रमशाळांमधील विद्यार्थी निवासी असल्याने त्यांना चांगल्या शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात याकरिता नवीन इमारत संकुल बांधकामाकरिता सन २०११-१२ या वर्षाकरिता रुपये १९६ कोटी १२ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

**४७. अल्पसंख्याक विकास.--** राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरिता सन २०११-१२ या वर्षासाठी भरीव वाढ करून रुपये २७५ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला आहे.

**४८. रस्ते विकास.--** राज्याच्या रस्ते विकासासाठी सन २०११-१२ मध्ये रुपये २ हजार ७४९ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे. यापैकी राज्यमार्गासाठी रुपये ७९५ कोटी प्रस्तावित असून, १ हजार ७७५ किलोमीटर रस्ते विकासाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रमुख जिल्हा मार्गांच्या बांधणी व इतर कामांसाठी रुपये ७०६ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित असून त्यातून २ हजार किलोमीटर रस्ते विकासाचे उद्दिष्ट आहे.

**[ श्री. अजित पवार ]**

**४८.१** केंद्रीय मार्ग निधी योजनेअंतर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रुपये ४३५ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित असून त्यामधून ८५० किलोमीटर रस्ते विकासो उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**४८.२** नाबार्ड साहाय्यित रस्ते विकास योनजेअंतर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रुपये ५०० कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित असून त्यातून २ हजार किलोमीटर रस्ते सुधारणेचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**४९. खाजगी कारणांतर्गत रस्ते विकास.--** सद्य:स्थितीत खाजगीकरणांतर्गत रुपये २ हजार ७१ कोटींचे चौपदरीकरणाचे १० प्रकल्प प्रगतिपथावर असून त्यामधून ६७४ किलोमीटर लांबीचे चौपदरीकरण होणार आहे. रुपये ९ हजार ३०५ कोटींचे चौपदरीकरणाचे २७ प्रकल्प निविदेच्या विविध स्तरांवर असून त्यामधून १ हाजर ९२३ किलोमीटर लांबीचे चौपदरीकरण होणार आहे. खाजगीकरणांतर्गत चौपदरीकरणाच्या काही प्रकल्पांसाठी वर्धनक्षमता तफावत निधी म्हणून रुपये १५० कोटींची तरतूद सन २०११-१२ च्या आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित केली आहे.

**५०. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.--** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रुपये ४ हजार ९७० कोटींचे १२ प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून रुपये ३ हजार ७४० कोटी किंमतीचे १२ प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. या प्रकल्पांकरिता देय शासन सहभागापैकी यावर्षी रुपये १५० कोटी इतके अर्थसाहाय्य देण्याचे प्रस्तावित आहे.

**५१. इमारत बांधकाम.--** इमारत बांधकामासाठी २०११-१२ या वर्षी रुपये १२७ कोटी नियतव्यय प्रस्तावित असून यामधून ५२ हजार ५०० चौरस मीटर अनिवासी व ११ हजार ५०० चौरस मीटर निवासी इमारतींचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट आहे.

**५२. ऊर्जा.--** डिसेंबर २०१२ पर्यंत खात्रीशीर वीजपुरवठा करून महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असून, त्याचाच एक भाग म्हणून महानिर्मितीच्या वीज प्रकल्पांकरिता तसेच महावितरणाच्या पायाभूत सुविधा योजनेकरिता निधी देण्यात येणार आहे.

**५३. महानिर्मितीचे प्रकल्प.--** २०११-१२ या वर्षात खापरखेडा येथे संच क्रमांक ५, भुसावळ संच क्रमांक ४ व ५, या प्रकल्पांमुळे १ हजार ५०० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता उपलब्ध होणार आहे.

**५३.१.** महानिर्मितीमार्फत उरण गॅस टर्बाईन प्रकल्पातून १ हजार २२० मेगावॅट, भुसावळ, परळी व नाशिक येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्पांतून १ हजार ५७० मेगावॅट, लातूर येथील कोळशावर आधारित १ हजार ३२० मेगावॅट किंवा गॅसवर आधारित १ हजार ५०० मेगावॅट, धोपावे येथील १ हजार ९८० मेगावॅट व दोंडाईचा येथील ३ हजार ३०० मेगावॅटचे प्रकल्प तसेच चंद्रपूर व शिवाजीनगर, तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे १२९ मेगावॅटचे सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. कोराडी व नाशिक येथील प्रकल्पांचे आधुनिकीकरण व नूतनीकरण करण्याचे ठरविले असून, महानिर्मिती कंपनीला या सर्व योजनांकरिता रुपये १ हजार ५०० कोटी देण्यात येणार आहेत.

[ श्री. अजित पवार ]

**५४. महावितरणचे वीज प्रकल्प.--** केंद्र शासनाकडून मिळालेल्या निधीच्या माध्यमातून महावितरण संपूर्ण महाराष्ट्रात पायाभूत सुविधा प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पामुळे वितरण हानी व वितरणरोहित्रे बिघाडाचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे खात्रीशीर वीजपुरवठा करणे शक्य होईल. स्वतंत्र गावठाण फिडर योजनेद्वारे गावातील कमाल भारावर नियंत्रण ठेवता येईल.

**५४.१.** महावितरण कंपनीच्या सर्व योजनांकरिता शासनाकडून सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ८०० कोटी इतका निधी देण्यात येणार आहे.

**५५. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा).--** ग्रामपंचायतींनी सौरऊर्जेच्या साहाय्याने सामुदायिक अभ्यासिका स्थापन करण्याचा अपारंपरिक ऊर्जा विकासाचा कार्यक्रम २०१०-११ मध्ये राज्यात ३ हजार ७६४ गावांमध्ये राबविला. २०१०-११ मध्ये हा कार्यक्रम ४ हजार ४३५ गावांमध्ये राबविण्यात येईल. महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींतर्गत हा कार्यक्रम राबविणे शासनाचे उद्दिष्ट आहे. महाऊर्जा कंपनीस या योजनांकरिता रुपये ७५ कोटी इतका निधी २०११-१२ या वर्षात प्रस्तावित आहे.

**५६. विशाल उद्योग प्रकल्प.--** जून २००५ मध्ये घोषित विशाल प्रकल्प धोरणाला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या धोरणांतर्गत जानेवारी २०११ पर्यंत १६९ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये रुपये १ लक्ष ४४ हजार ५५६ कोटी एवढी गुंतवणूक व २ लक्ष १५ हजार लोकांना रोजगार मिळणे अपेक्षित आहे. यापैकी १११ प्रकल्प मागास भागात असून त्यातील ७० प्रकल्प मराठवाडा व विदर्भात आहेत. ७८ विशाल प्रकल्पात उत्पादनास सुरुवात झाली आहे. सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत लघु, मध्यम, मोठ्या व विशाल प्रकल्पांना २०११-१२ या वर्षाकरिता रुपये ४०० कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.

**५७. नवीन वस्त्रोद्योग धोरण.--** मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणाऱ्या क्षेत्रांमध्ये कृषी क्षेत्रानंतर वस्त्रोद्योग क्षेत्राचा क्रमांक लागतो. संपूर्ण देशात उत्पादित होणाऱ्या कापसापैकी २० टक्के उत्पादन महाराष्ट्रात होते. या कापसावर राज्यातच प्रक्रिया झाल्यास मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध होईल. त्याअनुषंगाने लवकरच राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात येणार आहे. त्यासाठी रुपये १०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**५८. यंत्रमाग वीज अनुदान.--** राज्यातील यंत्रमाग उद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी यंत्रमागधारकांना वीजदेयकात सवलत देण्यात येते. २०११-१२ या वर्षाकरिता रुपये ५०० कोटींची तरतूद त्यासाठी प्रस्तावित आहे.

**५९. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान.--** जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत राज्यातील ५ नागरी समूहांमध्ये 'शहरी गरिबांना मूलभूत सुविधा' व इतर ८४ शहरांमध्ये 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' अशी दोन उपअभियाने झोपडपट्टी विकासाकरिता राबविली जात आहेत. आतापर्यंत ३६ हजार ९१३ घरकुले बांधण्यात आली

[ श्री. अजित पवार ]

असून ८३ हजार ९५१ घरकुलांची कामे प्रगतिपथावर आहेत. याकरिता रुपये २ हजार ३१९ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे

**५९.१** सन २०११-१२ या वर्षाकरिता या दोन्ही योजनांकरिता केंद्र व राज्य हिश्श्यापोटी अनुक्रमे रुपये ९८० कोटी ६० लक्ष व रुपये ४५९ कोटी ३९ लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**६०. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान.--** जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत नागरी पायाभूत सुविधा निर्मितीसाठी केंद्र शासनाने आतापर्यंत महाराष्ट्राचे एकूण रुपये १२ हजार ४८९ कोटींचे ९३ प्रकल्प मंजूर केले आहेत. लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमांमध्ये ८६ शहरांच्या रुपये २ हजार ७०० कोटी किमतीच्या ९४ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. हे सर्व प्रकल्प प्रगतिपथावर आहेत त्यासाठी केंद्र व राज्याचा हिस्सा मिळून २०११-१२ या वर्षाकरिता रुपये २ हजार ५०० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**६०.१.** यापैकी काही प्रकल्पांतील दरसूचीत वाढ झाल्यामुळे कमकुवत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर पडणारा भार कमी करण्यासाठी दरसूचीतील फरकाच्या ५० टक्के रक्कम शासन 'ड' वर्ग महानगरपालिका व नगरपालिकांना अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देणार आहे. त्यासाठी रुपये ४०० कोटींची तरतूद उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**६१. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान.--** महाराष्ट्र राज्यातील निवडक शहरांमध्ये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत १२ प्रकल्पांना मंजुरी दिली असून, त्यासाठी २०११-१२ या वर्षाकरिता रुपये २५० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**६२. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प.--** मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पात प्रथमत: टप्पा-१ अंतर्गत रुपये २ हजार ५०० कोटींची विविध कामे हाती घेण्यात आली. डिसेंबर २०१० अखेर या कामांवर रुपये २ हजार कोटी इतका खर्च करण्यात आला. टप्पा-२ व टप्पा-३ मध्ये रुपये ६१४ कोटी रकमेची नवीन कामे करण्याचे प्रस्तावित असून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळास जोडणारा एलिव्हेटेड मार्ग आणि पूर्व मुक्तमार्ग यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातही या प्रकल्पाचा विस्तार करून रुपये १ हजार ४०० कोटींची कामे प्रस्तावित असून काही कामे प्रगतिपथावर आहेत.

**६३. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प.--** मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पातील वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या प्रथम टप्प्याचे काम प्रगतिपथावर असून ते नोव्हेंबर २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. चारकोप-वांद्रे-मानखुर्द या दुसऱ्या टप्प्यासाठी केंद्र शासनाने रुपये १ हजार ५३२ कोटी व्यवहार्य तफावत निधी मंजूर केला आहे.

**६४. विमानतळ विकास.--** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत विमानतळांचे व्यवस्थापन आणि विमानतळांचा विस्तार/विकास करण्यात

[ श्री. अजित पवार ]

येतो. अमरावती, जळगाव, सोलापूर, गडचिरोली, कराड, धुळे, राजगुरुनगर व इतर विमानतळांसाठी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रुपये १६२ कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करून दिला आहे. मिहान प्रकल्पासाठी रुपये ६९ कोटी एवढा भरीव नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

**६५. पर्यटन प्रसिद्धी व प्रचालन.--** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्धी व प्रचालनासाठी रुपये २५ कोटी देण्यात येणार आहेत.

**६६. अष्टविनायक मंदिरे.--** अष्टविनायक मंदिर विकासाकरिता रुपये १० कोटी निधीची तरतूद करण्यात येईल.

**६७. अखिल भारतीय नाट्य परिषद.--** अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या विविध प्रकल्पांसाठी रुपये ५ कोटी निधी उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे.

**६८. कोल्हापूर चित्रनगरी.--** मराठी चित्रपट आणि मालिका निर्मितीसाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता चित्रनगरी कोल्हापूर येथे चित्रीकरणासाठी कलागारे/चित्रीकरण स्थळे उभारणे आणि इतर सुविधा निर्माण करणे याकरिता शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येतील. त्यासाठी प्रारंभी रुपये १० कोटी निधी देण्यात येईल.

**६९. किल्ले विकास.--** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित असलेल्या शिवनेरी, सिंहगड, प्रतापगड आणि रायगड या महत्त्वाच्या ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याची शासनाची योजना आहे. या किल्ल्यांच्या परिसरात दृकश्राव्य प्रयोग, माहिती व मार्गदर्शन केंद्र आणि पर्यटकांसाठी इतर सुविधांची आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग या महत्त्वाच्या सागरी किल्ल्यांच्या जतन व संवर्धनासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येतील. ऐतिहासिक किल्ले संवर्धन व जतन यासाठी एकूण रुपये २० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

**७०. बीच सुरक्षा.--** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून कोकण किनारपट्टीवरील निवडक २५ किनाऱ्यांवर बीच सुरक्षा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव असून त्याकरिता रुपये १० कोटी देण्यात येतील.

**७१. विशेष निसर्ग पर्यटन योजना.--** राज्यातील वन्यजीव क्षेत्रामध्ये वाघांच्या व इतर वन्यजीवांच्या दर्शनाचा आनंद घेण्याकरिता वन क्षेत्रामध्ये संरक्षणाची, अधिवास विकासाची व पर्यटकांच्या सुविधा वाढविण्याची कामे हाती घेणे आवश्यक आहे. व्याघ्र प्रकल्प पर्यटनासाठी रुपये २५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे. निसर्ग पर्यटनास प्रोत्साहन मिळावे यासाठी गोरेवाडा व गोरेगाव येथील प्राणी संग्रहालयासाठी अनुक्रमे रुपये २० कोटी व रुपये ८ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**७२. गेट वे ऑफ इंडिया तरंगती जेट्टी.--** गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथून घारापुरी, मांडवा, जेएनपीटी, तसेच हार्बर क्रुझिंग अशी प्रवासी/पर्यटक वाहतूक करण्यात येते. गेट वे ऑफ इंडिया येथील अस्तित्वातील जेट्टी सुविधा प्रवासी वाहतुकीसाठी अपुरी पडत असून त्यामुळे प्रवाशंना बोटीमध्ये

[ श्री. अजित पवार ]

चढ-उतार करणे अडचणीचे ठरत आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या सहमतीने त्यासाठी तरंगती जेट्टी सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता २०११-१२ मध्ये रुपये ५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**७३. तीर्थक्षेत्र विकास विशेष आराखडा.--** सन २०११-१२ मध्ये श्रीक्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर तसेच पालखीतळ विकास विशेष कृती आराखड्यासाठी रुपये ८५ कोटी, श्री गजानन महाराज श्रीक्षेत्र विशेष कृती आराखड्यासाठी रुपये ५५ कोटी आणि श्रीक्षेत्र मोझरी, तीर्थक्षेत्र विशेष विकास आराखड्यासाठी रुपये २५ कोटी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याशिवाय कोल्हापूर येथे महालक्ष्मी शक्तिपीठाच्या ठिकाणी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. सन २०११-१२ या वर्षात त्यासाठी रुपये १० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. वलगाव, तालुका व जिल्हा अमरावती येथे संत गाडगेबाबांचे समाधी स्थळ विकसित करून मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल.

**७३.१.** डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण व कृषी क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे, त्याची जाणीव ठेवून पापळ, जिल्हा अमरावती येथील जन्मस्थळाच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात येत आहे. त्यासाठी रुपये ५ कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**७३.२.** सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील निनाईदेवी याठिकाणी वर्षभर हजारोंनी भाविक आणि पर्यटक भेट देत असतात. त्यांना विविध अत्यावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन २०११-१२ या वर्षात रुपये १ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**७३.३** हजरत ख्वाजा शमना मोहम्मद मीरसाहेब दर्गा हा दक्षिण महाराष्ट्रातील एक जागृत दर्गा आहे. दरवर्षी या श्रद्धास्थानास लाखो भाविक भेट देतात. या श्रद्धास्थानास भेट देणाऱ्या भाविकांना विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**७४. चंद्रपूर शहराचा विकास.--** चंद्रपूर शहराला ५०० वर्षे पूर्ण झाली आहेत. आज या शहराची प्रमुख ओळख तेथून महाराष्ट्राला प्राप्त होणाऱ्या २ हजार ५०० मेगावॅट विजेमुळे आहे. तथापि, संपूर्ण महाराष्ट्राला वीज उपलब्ध करून देत असताना, या शहराच्या पायाभूत सुविधांवर मोठा ताण पडत आहे. या शहराच्या प्रदूषणाची पातळीही बरीच वर आहे. त्याचे विपरित परिणाम या शहरावर होत आहेत.

**७४.१.** राज्यात निर्मिती आणि विक्री होणाऱ्या विजेवर अधिक शुल्क वा कर आकारून त्या निधीतून वीज निर्मिती केंद्र असलेल्या शहरांच्या किंवा गावांच्या पायाभूत सुविधांत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. यामुळे महानिर्मितीची औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र असलेल्या चंद्रपूर, परळी, पारस, भुसावळ, एकलहरे, कोराडी, खापरखेडा तसेच खाजगी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र असलेल्या शहर व गावातील विकासकामांना मोठी मदत होईल. चंद्रपूर शहराच्या तीव्र समस्या लक्षात घेता, त्या शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी रुपये २५० कोटींचा तीन वर्षांचा आराखडा तयार करण्यात येईल. मी त्याकरिता रुपये २५ कोटी एवढा नियतव्यय राखून ठेवला आहे.

[ श्री. अजित पवार ]

**७५. पोलीस दल आधुनिकीकरण.--** केंद्रपुरस्कृत पोलीस दल आधुनिकीकरण योजना २०००-०१ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी २०११-१२ या वर्षाकरिता आवश्यक तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने पोलीस प्रशिक्षणाच्या इमारत बांधकामासाठी तसेच पोलीस प्रशिक्षणासाठी साधनसामग्री खरेदी, शस्त्रे, मोटार वाहने इत्यादींसाठी यावर्षी रुपये ५५ कोटी ७५ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे. कारागृह इमारत बांधकामासाठी व कारागृहातील सुरक्षेमध्ये सुधारणा करण्यासाठी रुपये १५ कोटी प्रस्तावित आहे.

**७६. पोलिसांच्या निवासी व कार्यालयीन इमारतींचे बांधकाम.--** पोलिसांच्या निवासी व कार्यालयीन इमारतींच्या बांधकामासाठी २०११-१२ करिता अनुक्रमे रुपये ११५ कोटी ३४ लक्ष व रुपये १०० कोटी ४७ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे. याद्वारे पोलिसांसाठी यावर्षी सुमारे ६ हजार निवासस्थाने उपलब्ध होतील.

**७७. सी. सी. टी. एन. एस. प्रकल्प.--** केंद्र शासनाने ११ व्या योजनेमध्ये 'क्राइम ॲण्ड क्रिमीनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम' ही योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेअंतर्गत देशातील विविध पोलीस ठाणी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यालये नेटवर्क सिस्टिमद्वारे जोडण्यात येणार आहेत. या प्रकल्पास केंद्र शासनाची नुकतीच मान्यताही मिळाली आहे. केंद्र शासनाकडून यासाठी रुपये ८५ कोटी ६५ लक्ष एवढा निधी प्राप्त होणार आहे. राज्य शासनही त्यासाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करून देईल.

**७८. मुंबईतील सुरक्षा व्यवस्था.--** मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने संपूर्ण शहरात सी. सी. टी. व्ही. यंत्रणा बसविण्याच्या शासनाचा मानस आहे. या अंतर्गत मुंबई शहरात टप्प्याटप्प्याने सुमारे ५ हजार सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरण या तत्त्वावर राबविला जाईल.

**७९. विधान भवन, मुंबई येथील इमारतीची सुरक्षा व्यवस्था बळकट करणे.--** विधान भवन, मुंबई इमारतीची सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी अद्ययावत सुरक्षा साधने खरेदी करण्यात येणार आहेत. त्याकरिता अंदाजे रुपये ५ कोटी एवढा खर्च अपेक्षित असून त्याची तरतूद सन २०११-१२ या वित्तीय वर्षात प्रस्तावित करण्यात आली आहे.

**८०. महसूल विभागाच्या प्रशासकीय इमारतींची बांधकामे.--** महसूल क्षेत्रीय स्तरावरील तहसील व प्रशासकीय इमारतींच्या बांधकामासाठी सन २०११-१२ या वर्षासाठी रुपये १४३ कोटी ८५ लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे. या तरतुदीमधून अपूर्ण अवस्थेतील ६० कामे व नवीन २१७ कामे हाती घेण्यात येतील.

**८१. राज्य शासकीय गोदाम बांधकाम.--** चार महिन्यांची अन्नधान्य साठवणूक क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढील पाच वर्षात आवश्यक साठवणूक क्षमता तयार करण्याकरिता बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात नवीन शासकीय गोदाम बांधकाम व नूतनीकरणाकरिता सन २०११-१२ मध्ये रुपये ४० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

[ श्री. अजित पवार ]

८२. **न्यायालयांकरिता पायाभूत सुविधा.--** राज्यात विविध ठिकाणी न्यायालयांसाठी इमारती व न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधली जातात. सन २०११-१२ या वर्षाकरिता त्यासाठी रुपये ११७ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे. या वर्षात सुमारे ३० कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे.

८३. **ई-गव्हर्नन्स.--** पुणे, नागपूर, लातूर, नांदेड आणि सिंधुदुर्ग या ५ जिल्ह्यांत ७ ठराविक सेवा पुरविण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर 'ई-जिल्हा प्रस्ताव' राबविण्यात येणार आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागासाठी २०११-१२ करिता रुपये ४० कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

८४. **मराठी भाषेच्या विकासासाठी स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना.--** शासनाने महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवीवर्षात राजभाषा मराठीच्या सर्वांगीण समृद्धीसाठी तसेच वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांत कार्यरत असलेल्या, मराठी भाषेची निगडित संस्था आणि मंडळे एकाच छत्राखाली आणण्यासाठी स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन केला आहे. सन २०११-१२ या वर्षात मराठी भाषा विभागामार्फत विविध योजना राबविण्यासाठी आवश्यक तरतूद करण्यात आली आहे.

८४.१. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात मराठी भाषेच्या विकासासाठी सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालयांसाठी अर्थसाहाय्य म्हणून रुपये ३ कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

८५. **माहिती व जनसंपर्क.--** सन २०१०-११ या वर्षापासून दुर्मिळ छायाचित्रांचे फोटो डिजिटलायझेशन व दुर्मिळ माहितीपटांचे जतन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. माहिती व जनसंपर्क विभागासाठी सन २०११-१२ या वर्षाकरिता एकूण रुपये ४८ कोटी ९ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

८६. **महाराष्ट्र विधान मंडळ अमृतमहोत्सवी सोहळा.--** मुंबई विधान परिषदेची पहिली बैठक मंगळवार दिनांक २० जुलै १९३७ रोजी तसेच मुंबई विधानसभेची पहिली बैठक दिनांक १९ जुलै १९३७ रोजी पुणे येथे झाली होती. महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांच्या स्थापनेस ७४ वर्षे पूर्ण होऊन महाराष्ट्र विधान मंडळ अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहे.

८६.१. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षात उभय सभागृहांचा संयुक्त अमृतमहोत्सवी सोहळा दिनांक १९ जुलै २०११ ते दिनांक २० जुलै २०१२ या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात परिसंवाद, विधानमंडळाचा इतिहास, इतर प्रकाशने आदी उपक्रमांचा समावेश असेल. या प्रयोजनार्थ २०११-१२ या वर्षात रुपये ७ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

८७. **महाराष्ट्र विधान मंडळाच्या अमृत महोत्सवाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विधान भवन, मुंबई, नागपूर तसेच मॅजेस्टिक आमदार निवास, मुंबई या इमारतींचे नुतनीकरण.--** विधानमंडळाच्या कामकाजाचे विस्तारात असलेले स्वरूप लक्षात घेता विधान भवन, मुंबई तसेच नागपूर येथील इमारतीमध्ये संरचनात्मक बदल करणे आवश्यक झाले आहे. मॅजेस्टिक आमदार निवास इमारतीचेदेखील नूतनीकरण करावयाचे आहे. ही कामे तीन टप्प्यात करावयाची असून त्याकरिता २०११-१२ या वित्तीय वर्षात रुपये २५ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

[ श्री. अजित पवार ]

८८. **वार्षिक योजना.--** वार्षिक योजना सन २०११-१२ संबंधी, योजना आयोगासमवेत अंतिम चर्चा झालेली नाही. परंतु, मंत्रिमंडळ नियोजन उपसमितीच्या निर्णयानुसार राज्याच्या योजनेचे आकारमान रुपये ४१ हजार ५०० कोटी इतके ठरविण्यात आले आहे. या आकारमानाच्या १०.२ टक्क्यांप्रमाणे रुपये ४ हजार २३३ कोटी एवढी रक्कम अनुसूचित जाती उपयोजनेसाठी आणि ८.९ टक्क्यांप्रमाणे ३ हजार ६९३ कोटी ५० लक्ष एवढी रक्कम आदिवासी उपाययोजनेसाठी देण्यात आली आहे. जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी रुपये ४ हजार ३१९ कोटी ५० लक्ष देण्यात आले असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यात रुपये ५०० कोटींची वाढ करण्यात आली आहे.

८९. **राज्याची वित्तीय स्थिती.--** मार्च २०१० अर्थसंकल्प सादर करताना रुपये ९७ हजार ४३ कोटी महसुली जमा अपेक्षित केली होती. वर्षभरातील महसूल संकलनाचा कल पाहता सुधारित अंदाज रुपये १ लक्ष ७ हजार १५९ कोटी एवढा निश्चित केला आहे. वर्षाच्या सुरुवातीस महसुली खर्च रुपये १ लक्ष ४ हजार ६९८ कोटी इतका अपेक्षित होता. सुधारित अंदाजात हा खर्च रुपये १ लक्ष १२ हजार ८४६ कोटी इतका निश्चित केला आहे. परिणामी वर्षाच्या सुरुवातीस अपेक्षित रुपये ७ हजार ६५४ कोटींची महसुली तूट काही प्रमाणात कमी होऊन रुपये ५ हजार ६८८ कोटींवर आलेली दिसते.

८९.१. सन २०११-१२ या वर्षाचे महसुली उत्पन्न रुपये १ लक्ष २१ हजार ५०३ कोटी एवढे अपेक्षित आहे. महसुली खर्च रुपये १ लक्ष २१ हजार ४४५ कोटी एवढा आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, परिणामी महसुली तूट पूर्णपणे भरून काढली आहे, शिवाय रुपये ५८ कोटी महसुली अधिक्य अपेक्षित आहे.

८९.२. केंद्र शासनाने कर्ज उभारणीची मर्यादा स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्के एवढी निर्धारित केली आहे. तथापि, वित्तीय शिस्तीचा भाग म्हणून स्थूल राज्य उत्पन्नाच्या १.९३ टक्के एवढेच कर्ज उभारण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग-२ कडे वळतो.

## भाग दुसरा

अध्यक्ष महोदय, मी आता अर्थसंकल्पाचा भाग-२ सभागृहापुढे सादर करीत आहे.

१. **विक्रीकर महसुलाचा आढावा.--** या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला आर्थिक मंदीचे सावट दूर होत असल्याची चिन्हे दिसत होती. यावर आधारित या वर्षाकरिता विक्रीकर संकलनाचे उद्दिष्ट नक्त रुपये ३५,९८६ कोटी ठरविण्यात आले होते. तथापि वर्षातील कर संकलनाचा कल पाहता सुधारित अंदाजे रुपये ४०,४१५ कोटी एवढे निश्चित केले आहे.

२. **व्यापाऱ्यांसाठी ई-सेवा.--** महाराष्ट्राचा विक्रीकर विभाग हा ई-सेवा देण्यामध्ये देशात आघाडीवर आहे.

सन २०११-१२ यावर्षी राज्याने केंद्रीय विक्रीकर कायद्याखाली "सी" व "एफ" नमुने इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देण्याचे व यांच्या पडताळणीकरिता टीनक्सीजचा (TINXSYSY) वापर करण्याचे प्रस्तावित

[ श्री. अजित पवार ]

केले आहे. तसेच माहितीचे जलद गतीने विश्लेषण करण्याकरिता बिझिनेस इंटेलिजन्स टूल्स व डेटा वेअर हाउसचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व सुधारणांमुळे महसूल संकलनावर निश्चित चांगला परिणाम दिसून येईल.

**३. मूल्यवर्धित कर कायद्यात कार्यपद्धतीविषयी व इतर सुधारणा.--** विक्रीकर कायद्यात काही कार्यपद्धतीविषयक व इतर दुरुस्त्या प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये सुधारित विवरणपत्र संबंधित तरतुदी, स्वेच्छा नोंदणीकरिता आगाऊ कर भरणाऐवजी अनामत, विक्रीकराखाली देण्यात येणाऱ्या परताव्याच्या कालावधीमध्ये बदल, आंतरराज्य विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी परताव्याकरिता करावयाच्या अर्जाच्या तरतुदीमध्ये बदल, कलम ५१ च्या प्रयोजनार्थ निर्यातदारांची व्याख्या करण्याची तरतूद तसेच जाणीवपूर्वक परिपूर्ण लेखापरीक्षण अहवाल सादर न करणाऱ्यांवर शास्तीसंबंधी तरतुदी तसेच काही तांत्रिक दुरुस्त्या प्रस्तावित केल्या आहेत.

**४. हवाला व्यापाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई.--** बाजारात काही व्यापारी कर चोरीच्या उद्देशाने प्रत्यक्ष मालाची विक्री न करताच खोटी बीजके देतात अथवा सादर करतात. प्रत्यक्ष मालाची विक्री वा खरेदी न करता फक्त बीजक देण्याचा अथवा घेण्याचा व त्याद्वारे खोटे दावे दाखल करण्याचा अपराध सिद्ध झाल्यास त्यासाठी सध्याच्या लागू असलेल्या शिक्षेत वाढ करून कमीत कमी १ वर्षाची पण जी २ वर्षापर्यंत असू शकेल अशी तरतूद प्रस्तावित करीत आहे.

**५. ऊस खरेदी कर वसूल करण्याच्या पद्धतीत बदल.--** ऊस खरेदी कर हा साखर कारखान्यांकडून गाळप हंगामात देय असल्यामुळे खेळते भांडवल म्हणून उभारलेल्या कर्जातून अनेक वेळा कर द्यावा लागतो. ऊस खरेदी कराची वसुली ही पूर्णपणे हंगामातच न करता, दर महिन्याला होणाऱ्या साखर विक्रीतून प्रति किलो विहित रकमेप्रमाणे करण्याचे प्रस्तावित करीत आहे. सप्टेंबर अखेरच्या शेवटच्या विवरणपत्रात उर्वरित रक्कम भरून घेण्यात येईल किंवा परतावा असल्यास तो कारखान्यास परत करण्यात येईल. या अनुषंगाने ऊस खरेदी कर कायद्यात काही सुधारणा प्रस्तावित आहेत.

मला आशा आहे की, ह्या पद्धतीमुळे ऊस खरेदी कराची वसुली सुलभ होईल.

**६. आजारी साखर कारखाने.--** राज्यात अनेक साखर कारखाने सध्या बंद अथवा आजारी आहेत. अशा आजारी उद्योगांकडून करांची वसुली करणे कठीण होते. अनेकदा अशा कारखान्यांवर असलेला कर व त्यावरील व्याज व दंड यांच्या थकबाकीमुळे या कारखान्यांचा पुनरुज्जीवन कार्यक्रम तयार करणे अडचणीचे होते. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी मी सभागृहासमोर एक योजना प्रस्तावित करीत आहे. ज्या कारखान्यांचे नक्त मूल्य उणे झाले आहे व ज्या कारखान्यांनी मागील तीन वर्षात ऊसाचे गाळप केलेले नाही असे आजारी साखर कारखाने या योजनेखाली येऊ शकतील. पुनरुज्जीवन कार्यक्रमांतर्गत कारखान्यांकडे असलेली विक्रीकर व ऊस खरेदी कराची थकीत मूळ रक्कम एकरकमी भरली गेली तर त्यावर आकारलेले दंड व व्याजाची रक्कम माफ करण्याचे प्रस्तावित करीत आहे. यामुळे आजारी साखर कारखान्यांकडे असलेली थकीत कर रक्कमही वसूल होईल. ही योजना दिनांक १ एप्रिल २०११ पासून १ वर्षाकरिता लागू राहील.

अध्यक्ष महोदय, मी आता माझे काही करविषयक प्रस्ताव सभागृहापुढे सादर करीत आहे.

[ श्री. अजित पवार ]

**७. १२.५ टक्के या कराच्या वरच्या पातळीच्या दरात सरसकट वाढ नाही.--** मागील वर्षी राज्यांनी विक्रीकराच्या वरच्या पातळीचा दर १२.५ टक्क्यांवरून सरसकट १३.५ टक्के अथवा १५ टक्क्यांपर्यंत नेला. महाराष्ट्राने १२.५ टक्क्यांचा दर वाढवलेला नाही, तरीसुद्धा राज्याच्या विक्रीकर महसुलात विक्रमी वाढ झालेली आहे. अध्यक्ष महोदय, मला सांगण्यास आनंद होतो की, या वर्षीही १२.५ टक्के या वरच्या पातळीच्या दरात वाढ प्रस्तावित केलेली नाही.

**८. जीवनावश्यक वस्तूंच्या करमाफीस मुदतवाढ.--** तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर, सोलापुरी चादर व टॉवेल या वस्तूंवर राज्यात विक्रीकरातून ३१ मार्च २०११ पर्यंत सूट देण्यात आली आहे. राज्यांच्या वित्त मंत्र्यांच्या शक्ती प्रदत्त समितीने यावर ५ टक्के कराची शिफारस केली आहे. परंतु या सर्वसामान्यांच्या गरजेच्या वस्तू असल्यामुळे ही करमाफी ३१ मार्च २०१२ पर्यंत चालू राहील, असे मी घोषित करतो. तसेच घरगुती गॅस (एल. पी. जी.) या वर्षीही करमुक्तच ठेवण्यात आला आहे.

या वर्षीच्या केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात केंद्रीय अतिरिक्त उत्पादन शुल्क कायद्यात प्रस्तावित केलेल्या बदलामुळे कापड व साखरेवर विक्रीकराची आकारणी होऊ शकते. तथापि, या वस्तूंना करमुक्त ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचप्रमाणे चहावर दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत चालू असलेल्या ५ टक्के सवलतीच्या करदरास ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**९. एटीएफच्या सवलतीच्या दरात मुदतवाढ.--** राज्यात मुंबई, पुणेव्यतिरिक्त हवाई वाहतुकीला प्रोत्साहन देण्याकरिता या जिल्ह्यांव्यतिरिक्त राज्यात इतर ठिकाणी विमान इंधनावरील कराचा दर ४ टक्के ठेवण्यात आला होता. ही मुदत ३१ मार्च २०११ रोजी संपते. त्याला एक वर्षाकरिता म्हणजेच ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**१०. पूर्वरचित घरगुती बायोगॅस यंत्रावर करमाफी.--** अपारंपरिक ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन देण्याकरिता राज्याने यावरील कराचा दर शून्य अथवा ५ टक्के ठेवलेला आहे. बायोगॅस हे अपारंपरिक ऊर्जेसाठी ग्रामीण भागात वापरले जाणारे महत्त्वाचे साधन आहे. यामुळे पर्यावरणाचेही संरक्षण होते. याला अधिक प्रोत्साहन देण्याकरिता पूर्वरचित घरगुती वापराच्या बायोगॅस यंत्रावर पूर्ण माफ करण्याची घोषणा करीत आहे.

**११. चित्रपटाच्या कॉपीराइटवर करमाफी.--** अध्यक्ष महोदय, मुंबई हे भारतीय सिनेसृष्टीचे माहेर आहे. याचे सर्व स्तरातील लोकांना आकर्षण आहे. हा उद्योग राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणारा आहे. यामुळे कुशल, अकुशल कामगार तसेच तंत्रज्ञ अशा सर्व स्तरातील लोकांना रोजगाराची संधी प्राप्त होते. येथूनच या उद्योगाने आपली जगात बॉलीवूड म्हणून ओळख निर्माण केली आहे.

चित्रपटांच्या कॉपीराइट हस्तांतरणावर मूल्यवर्धित कर आकारण्यात येतो. चित्रपट निर्मिती होणाऱ्या अनेक राज्यात यावर कर आकारण्यात येत नाही. हा उद्योग इथेच वृद्धिंगत व्हावा व रोजगारात

**[ श्री. अजित पवार ]**

भर पडावी यादृष्टीने चित्रपटगृहात होणाऱ्या प्रदर्शनासंबंधी चित्रपटाच्या कॉपीराइट हस्तांतरणाला करमुक्त करण्याचे प्रस्तावित करीत आहे. यामुळे चित्रपटसृष्टीला निश्चित मोठी मदत मिळेल.

**१२. वडापाववर कराचा दर १२.५ टक्क्यांवरून ५ टक्के.--** उपाहारगृहात विकल्या जाणाऱ्या वडापाववर १२.५ टक्के कर लागतो. वडापाव हे महाराष्ट्रात सर्वसामान्य माणसांचे आवडते खाद्य आहे. तरी यापुढे उपाहारगृहात विकल्या जाणाऱ्या वडापाववरील कर १२.५ टक्क्यांवरून कमी करून ५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

**१३. राळ कर मुक्त.--** धूप, लोबान, अगरबत्ती यावर कराचा दर शून्य टक्के आहे. राळचा उपयोगही धूप व लोबानसारखाच होत असल्यामुळे राळ करमुक्त करण्याचे प्रस्तावित आहे.

**१४. सुका मेव्यावर कर सवलत.--** मागील वर्षी मनुका व बेदाणे करमुक्त करण्यात आले होते. इतर सुका मेव्यावर १२.५ टक्के कर आकारण्यात आला होता; परंतु त्यासोबत राज्यात उत्पादित व प्रक्रिया केलेल्या काजूवर सवलत योजना जाहीर करण्यात आली होती. अध्यक्ष महोदय, या व्यवसायात मोठ्या प्रमाणात राज्यात रोजगार उपलब्ध होतो. शेजारच्या काही राज्यांत सुका मेव्यावर कराचा दर ५ टक्के आहे. त्यामुळे हा व्यवसाय इतर राज्य स्थलांतरित होण्याची व रोजगारावर विपरित परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता इतर सुका मेव्यावर (मनुका, बेदाणे व काजूव्यतिरिक्त) कराचा दर ५ टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**१५. बेकरीच्या आपसमेळ योजनेत उलाढालीच्या मर्यादेत वाढ.--** सध्या लहान बेकरी व्यवसायाकरिता आपसमेळ योजनेखाली उलाढालीची मर्यादा रुपये ३० लाख अशी आहे. वाढलेल्या किमती लक्षात घेता उलाढालीची मर्यादा रुपये ३० लाखांवरून रुपये ५० लाख करण्यात येत आहे. यामुळे लहान बेकरी व्यावसायिकांना मदत होईल.

**१६. किरकोळ व्यापाऱ्यांसाठी आपसमेळ योजनेत दिलासा.--** किरकोळ व्यापाऱ्यांकरिता असलेल्या आपसमेळ योजनेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त विक्री ४ टक्के दराची असावी, असा उल्लेख आहे. सर्वसाधारण आधारभूत कर ५ टक्के झाल्यामुळे त्यात ४ टक्क्यांऐवजी ५ टक्के हा बदल करण्यात येत आहे. यामुळे व्यापाऱ्यांना ५ टक्के दराच्या आपसमेळ योजनेचा लाभ घेता येईल.

**१७. खादी ग्रामोद्योग प्रमाणित साबण उद्योगाला व्याज व दंड माफी.--** मागील वर्षाच्या अर्तसंकल्पात खादी ग्रामोद्योग प्रमाणित हस्तनिर्मित साबणाला दिनांक १ एप्रिल २०१० पासून पुढे करमुक्त करण्यात आले होते. हा उद्योग लहान असून ग्रामीण भागात प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणारा आहे. खादी ग्रामोद्योग प्रमाणित साबण उद्योगाच्या अडचणी लक्षात घेऊन दिनांक १ एप्रिल २००५ ते दिनांक ३१ मार्च २०१० या कालावधीकरिता वार्षिक रुपये २० लक्षपर्यंतच्या उलाढालीच्या करावर देय असलेले व्याज व दंड माफ करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र याकरिता सदर उद्योगाने या कालावधीच्या देय असलेल्या कराची संपूर्ण रक्कम ३० मार्च २०११ पर्यंत भरणे आवश्यक असेल.

राज्यात विविध योजना कार्यान्वित करण्याकरिता निधीची आवश्यकता असते. विक्रीकर, राज्य उत्पादन शुल्क व मुद्रांक शुल्क हे राज्याच्या महसुलाचे महत्त्वाचे घटक आहेत. राज्याच्या आर्थिक

[ श्री. अजित पवार ]

गरजा काही प्रमाणात पूर्ण करण्याकरिता या करांच्या माध्यमातून मी काही करवाढीचे प्रस्ताव सभागृहासमोर सादर करीत आहे.

**१८. घोषित मालावर कर ४ टक्क्यांवरून ५ टक्के.--** नुकत्याच सादर झालेल्या केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात केंद्रीय विक्रीकर कायद्याखाली घोषित मालावरील कराची कर्यादा ४ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आली आहे. यामुळे ज्या घोषित वस्तूंवर विक्रीकर यापूर्वी ४ टक्के होता तो ५ टक्के करण्याचा प्रस्ताव सादर करीत आहे. हे दर तत्संबंधी अधिसूचनेत उल्लेख केलेल्या तारखेपासून लागू होतील.

**१९. वाईनव्यतिरिक्त मद्यावरील कर संकलन पद्धतीमध्ये बदल.--** मद्यावर सध्या मूल्यवर्धित कराचा दर २५ टक्के आहे. हा कर प्रत्येक टप्प्यावर वजावटीसह आकारण्यात येतो. कराचा भार न वाढवता कर संकलन अधिक प्रभावीपणे होण्यासाठी राज्यात पहिल्या टप्प्यावरच (उत्पादक किंवा आयातदार) प्रत्यक्ष विक्री किमतीवर ५० टक्के, परंतु जे उत्पादन शुल्क विभागाद्वारा निश्चित मूल्यवर्धित कराव्यतिरिक्त किरकोळ विक्रीच्या कमाल किमतीच्या (MRP) २५ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतका कर आकारण्यात येईल. मद्य उत्पादकांना वजावट अनुज्ञेय असेल.

चार व वरच्या तारांकित हॉटेलमध्ये प्रत्यक्ष विक्री किमतीवर २० टक्के कर आकारण्यात येईल. इतर बार व रेस्टॉरेंटमधील मद्य विक्रीसाठी ५ टक्के दराने कर आकारणी होईल. यांना मद्य खरेदीवर कराची वजावट मिळणार नाही.

**२०. कार्बयुक्त शीतपेये.--** काही राज्यांमध्ये शीतपेयांवर कराचा दर २० टक्के आहे. याच धर्तीवर कार्बयुक्त शीतपेयांवरील कराचा दर १२.५ टक्क्यांवरून २० टक्के करण्याची घोषणा करीत आहे.

**२१. कार्यक्रमांच्या दूरदर्शन प्रसारण हक्कांच्या विक्रीवर कर.--** प्रसार माध्यमांना विकले जाणारे विविध कार्यक्रमांचे हक्क यांची उलाढाल मोठ्या प्रमाणात आहे व यांची उलाढाल बघता महसुलाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. विविध करमणूक किंवा खेळासारख्या कार्यक्रमांच्या दूरदर्शन प्रसारणाचे हक्क यांना अमूर्त वस्तूंच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. यावर ५ टक्के विक्रीकर आकारण्यात येईल.

**२२. गॉगल्स.--** गॉगल्सचा वापर हा सर्वसामान्य चष्म्यासारखा दृष्टिदोषाकरिता होत नाही. त्यामुळे गॉगल्सवर कराचा दर १२.५ टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**२३. वीजनिर्मिती, पारेषण, वितरण, टेलिकॉम, रेल्वे, संरक्षण इत्यादींच्या खरेदीवर सवलतीचा दर ४ टक्क्यांवरून ५ टक्के.--** मूल्यवर्धित कराच्या कलम ८ (५) खाली वीजनिर्मिती, पारेषण व वितरण तसेच टेलिकॉम उद्योग, रेल्वे व संरक्षण खाते इत्यादींना केलेल्या विक्रीकर सवलतीच्या दराने ४ टक्के कर आकारण्यात येतो. सर्वसाधारण आधारभूत कराचा दर ४ टक्क्यांवरून ५ टक्के केल्यामुळे हा सवलतीचा दरही ५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

[ श्री. अजित पवार ]

**२४. देशी, विदेशी मद्याच्या व बिअरच्या उत्पादन शुल्काच्या व मूल्यवर्धित कराव्यतिरिक्त किरकोळ विक्रीच्या कमाल किमतीच्या सूत्रात व न्यूनतम दरात बदल करणे.--** राज्य उत्पादन शुल्काद्वारा महसूल वाढ करणेसाठी देशी, विदेशी मद्य तसेच बिअरच्या उत्पादन शुल्काच्या व मूल्यवर्धित कराव्यतिरिक्त येणाऱ्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीच्या सूत्रात व उत्पादन शुल्काच्या न्यूनतम दरात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मद्याचा उत्पादन शुल्काचा न्यूनतम दर वाढवून, रुपये ९५ प्रति प्रूफ लिटर देशी मद्यासाठी, रुपये २४० प्रति प्रूफ लिटर विदेशी मद्यासाठी, रुपये ३३ प्रति बल्क लिटर सौम्य बिअरसाठी व रुपये ४२ प्रति बल्क लिटर किण्वीत बिअरसाठी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने अधिसूचना लवकरच निर्गमित करण्यात येत आहेत. त्यामुळे शासनाच्या महसुलात भरीव वाढ होणार असून सदर वाढ ही सन २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अंदाजात अंतर्भूत केली आहे.

**२५. मुद्रांक शुल्क कायद्यात सुधारणा.--** आता मी मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मध्ये काही सुधारणा सभागृहासमोर मांडत आहे.

**२६. शेअर व भांडवली बाजारासंबंधी मुद्रांक शुल्कात सुधारणा.--** भांडवली बाजारात भाग भांडवल रोखेसंबंधी व वस्तूंच्या वायदे बाजारात अनेक प्रकारचे व्यवहार होतात, त्यामध्ये रोखे व्यवहार, वायदा व्यवहार, ग्राहकांसाठी केलेले खरेदी-विक्रीचे व्यवहार, स्वत:च्या कंपनीच्या नावे केलेले खरेदी-विक्री व्यवहार अशा अनेक प्रकारच्या व्यवहारांवर वेगवेगळ्या दराने मुद्रांक शुल्क आकारले जाते. त्यामुळे मुद्रांक शुल्क आकारणीचे काम क्लिष्ट होते. आता या सर्व प्रकारच्या व्यवहारांसाठी एकाच ०.००५ टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारण्याचे प्रस्तावित करीत आहे. यामुळे कर आकारणी सुटसुटीत होईल.

**२७. भाडे हस्तांतरणावर बाजार मूल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क.--** मुंबईमधील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी दीर्घकाळ असलेले भाडेतत्त्वावरील घरांचे फार मोठ्या प्रमाणात व्यवहार होतात. सदर व्यवहार हे बाजारमूल्यावर आधारित असून प्रत्यक्षात दस्तामध्ये ते मूल्य न घेताच दस्त नोंदविले जातात, असे निदर्शनास आले आहे. अशा दस्तांवर योग्य तो मुद्रांक शुल्क आकारण्यासाठी सदर प्रकारचे हस्तांतरणावर बाजारमूल्य आधारित पूर्ण मुद्रांक शुल्क आकारले जाईल, असे प्रस्तावित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, करविषयक प्रस्ताव सादर करताना राज्याच्या विविध योजनांसाठी लागणाऱ्या अतिरिक्त महसुलाची गरज व करवाढीसंबंधी मर्यादा लक्षात घेऊन सर्वसामान्य नागरिकांवर कराचा अतिरिक्त बोजा न टाकता संतुलन राखण्याचा प्रयत्न केला आहे. या कर प्रस्तावांद्वारे सुमारे रुपये १,००० कोटींचा अतिरिक्त महसूल प्राप्त होईल असा अंदाज आहे, यास सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल याची मला खात्री आहे.

**जय हिंद, जय महाराष्ट्र !**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

(श्री. अजित पवार, माननीय वित्त मंत्री यांच्या अर्थसंकल्पीय भाषणानंतर)

**अध्यक्ष** : सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर झाला आहे.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

**श्री. शशिकांत शिंदे :** अध्यक्ष महोदय, सभागृहात अर्थसंकल्प सादर करीत असताना, या चांगल्या अर्थसंकल्पाची राज्यातील जनतेला माहिती मिळेल म्हणून जाणीवपूर्वक विरोधी पक्षाने हा गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थसंकल्प सादर करीत असताना अशा प्रकारे गोंधळ घालण्याची महाराष्ट्र राज्याच्या इतिहासामध्ये घडलेली ही पहिलीच घटना आहे, म्हणून आम्ही या घटनेचा निषेध करतो.

अध्यक्ष महोदय, लोकसभेतदेखील गोंधळ झाला होता; परंतु तेथे अर्थसंकल्प सादर करीत असताना तेथील विरोधी पक्षाने सभागृहाचा मान ठेवला. आज या सभागृहात अर्थसंकल्प सादर करीत असताना जाणीवपूर्वक गोंधळ करण्यात आला. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ही गोष्ट जाणीवपूर्वक केली असल्यामुळे आपण त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी. सभागृह फक्त आम्हीच चालवायचे का ? उद्यापासून सभागृहात ते बोलत असताना आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही.

(गोंधळ)

**अध्यक्ष :** सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक २४ मार्च २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २३ मिनिटांनी, गुरुवार
दिनांक २४ मार्च २०११ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

**येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.**